# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२०१
२५६०१२०२
फॅक्स : ०२०-२५६९१३४१

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ac.in
E-mail : coe@unipune.ac.in


## अत्यंत महत्वाचे

संदर्भ : परीक्षा/BCS/70 दिनांक : २६ एप्रिल, २०११

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संबंधित संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.

**विषय : प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान (संगणक), बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एफ.टी.या परीक्षांचे मॉडेल अन्सर व स्किम ऑफ मार्किंग महाविद्यालयांना देण्याबाबत..**

महोदय / महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान, बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एफ.टी. या परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग करण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षा आयोजनापासून ते निकाल जाहीर करेपर्यंतच्या सर्व कार्यपध्दती, निकाल लावण्याबाबतचे अध्यादेश, इत्यादिबाबतची परिपत्रके वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर निर्गमित करण्यात आलेली आहेत.

वरील परीक्षांचे केंद्रिय मूल्यमापन करण्यासाठी मॉडेल अन्सर व स्किम ऑफ मार्किंग विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन महाविद्यालयांनी डाऊनलोड करुन घ्यावयाचे असून त्यांचा वापर करुन निकाल लावावयाचा आहे. सदर मॉडेल अन्सर व स्किम ऑफ मार्किंग डाऊनलोड करण्यासाठी खालील पध्दतीचा वापर करावा.

१. फाईल डाऊनलोड करण्यासाठी http://bcud.unipune.ac.in/login.aspx या लिंकचा वापर करावा.
२. लॉगिंन करण्यासाठी आपण आपल्या महाविद्यालयाचे affiliation/Eligibility चे युजरनेम व पासवर्ड वापरावे.
३. लॉगिन केल्यानंतर डाव्या बाजूला Model Answer Sheets ची लिंक दिसेल ती वापरुन आपण फाईल डाऊनलोडचे पेज उघडावे.
४. या पेजवर विषयावर फाईल डाऊनलोड करण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.
५. डाऊनलोड करावयाच्या सर्व फाईल या पीडीएफ फॉर्मात आहेत. त्या फाईल उघडण्यासाठी Adobe Reader ५.०+ किंवा तत्सम सॉफ्टवेअर वापरावे.
६. डाऊनलोड करताना काही अडचण असल्यास ०२०-२५६०१३८८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

वरील मॉडेल अन्सर व स्किम ऑफ मार्किंग केवळ परीक्षकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.शि.मो.आहिरे)
परीक्षा नियंत्रक